॥ श्री ज्ञानराज प्रसन्न ॥

श्री ज्ञानेश्वर महाराज कृत

# श्री दत्तस्तुती

दासराम [ राम गोविंद केळकर ]

कृत

## श्री दत्तस्तुती प्रसाद

प्रकाशकः- राम गोविंद केळकर
सांगली.

प्रकाशन शुक्रवार दि. १३-८-१९७१
श्रीज्ञानेश्वर महाराज यांचे ७०० व्या जयंती निमित्त

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

किमत २० पैसे

मुद्रकः–
न. व्यं. पडसलगीकर
विश्वास मुद्रणालय,
**सांगली.**



*ती. प. पू. श्रीमामानी केलेले श्रीज्ञानेश्वर माऊलीचे*

## भजन

ज्ञानेश्वर माउली । ज्ञानराज माउली तुकाराम ॥१॥
नमन तियेचे पाऊली । ज्ञानराज माउली तुकाराम ॥२॥
दीन जनांची साऊली । ज्ञानराज माउली तुकाराम ॥३॥
भक्तजनांस्तव धावली । ज्ञानराज माउली तुकाराम ।४।
गोविंदासी पावली । ज्ञानराज माउली तुकाराम ॥५॥

* *

॥श्री ज्ञानराज प्रसन्न॥

*श्रीज्ञानेश्वर महाराजकृत श्रीदत्तस्तुती*

पैल मेरूच्या शिखरी । एक योगी निराकारी । मुद्रा लावुनी खेचरी । प्राणयामी बैसला ॥१॥ तेणे सांडियेली माया । त्यजियेली कंथा काया । मन गेले विलया ब्रम्हानंदा माझारी ॥२॥ अनुदत ध्वनी नाद ।

तो पावला परमपद । अुन्मनी तुर्या विनोदे । छंदे छंदे डोलतसे ॥३॥ ज्ञान गोदावरीच्या तीरी । स्नान केले पांचाळेश्वरी । ज्ञानदेवाच्या अंतरी दत्तात्रय योगिया॥४।

* *

दासराम ( राम गोविंद केळकर ) कृत

## * श्रीदत्तस्तुति प्रसाद *

ॐ नमोजी श्रीगुरूलिंगा । रघुनाथ प्रिय अंतरंगा । श्रीराम हनुमत् कृपागंगा । गोविंद पितया नमोजी।१॥ भागवत धर्माचापाया । रचिला श्रीज्ञानराजे अभया । केली जगावरी छाया । आपुलिया कृपेची ॥२॥ त्यांनी केली श्रीदत्तस्तुती । ते पवाडेल काय मती । जे का तयांची अंतरस्थिती । जे निगुती चित्सुख ॥३॥ आपुली कृपाजरी । घडो येईल हे तरी । कृपा प्रकाश लहरी । अंतरी या लहरता ॥४॥ विश्वरचना अपार ।



तेथ नाना परीचे डोंगर । दगड मातीचे बहुतर । हिमालय आपाचा ॥५॥ ज्वालामुखी तेजाचा । बावटळी तो वायूचा । जड घन हवेचा । परी चैतन्याचा निजदेही ॥६॥ ज्या मेरू पैल एक व्योम । तेज.पुंज अरूप अनाम । चत्वार देहातीत अनुपम । पुंज नव्हे तेजोमय ॥७॥ अंतर्मुख जीवन जरी । सर्वश्रेष्ठ दिसे तरी । गर्जे गगन नवल परी । अनहत ॥८॥ पिंडीची षट्चक्रे अुल्लंघन । गाठलीया ब्रम्हांडस्थान । आज्ञाचक्री आज्ञासाधुन । नेम साधने अनुभवु ॥९॥ जेथ ते आपेआप । प्रकाशले निर्विकल्प । स्वयंसिद्ध स्वयंरूप । केवलानंद ॥ १० ॥ त्रिकुटी ज्याचा पायथा । सहस्त्रदळ ज्याचा माथा । चैतन्याची सत्ता । चावळे जेथ ॥ ११ ॥ देह जेथे विकल । इंद्रिये होती शिथील । ताणा ताणी नाही सैल । पंच प्राण ॥ १२ ॥ षट्चक्राची माळ ढिली । चैतन्याची खुलाढाली । म्हणोनि वाहिली लाखोली । सहस्रना-

माची ॥१३॥ येथ चंद्रु नसे परी चांदणे । मुक्तावस्था लये जेणे । प्राप्त करोनि घेतली तेणे । सुखरुप ॥१४॥ जेंथे स्थीर होती मन पवन । जिकीयेले पंचप्राण । मदनाचाही गेला जिरून । मद जेथ ॥१५॥ रजतम सत्व गुण । यांचे झाले अुल्लंघन । मनोहर त्रिकुट स्थान । पावन जे सर्वस्वे ॥१६॥ काय ते तेथीची शोभा लावण्याचा जो गाभा । पसरली आत्मप्रभा । आत्म त्वेसी ॥१७॥ सरले अधोगामी जीवन । अंतर्मूख स्थिर पूर्ण । अुर्ध्व लागले जेथून । अुर्ध्वदृष्टी ॥१८॥ मग ते होय अुर्ध्वमुख । श्वेत साक्षात्कार सम्यक । शामल रूपडे सुरेख । अनुभवितु ॥१९॥ आरक्त श्वेत शाम । पैल गुंफा अनुपम । नागमोडी परम । जीवन वाहे ॥२०॥ सहस्त्रदळ औटपीठ । नाद भरला घनदाट । मूळ मायेचे जे पीठ । जाणती संत ॥२१॥ ऐशा चैतन्य मेरूचे शिखरी । निरंजनी निराकारी । मुद्रालावुनी खेंचरी । योगी बैसला प्राणायामी ॥२२॥ आकाशाचा



शब्दगुण । आटला एसें निरंजन । जे का नसे आकारून । ठराविक ॥२३॥ हालत नाही । बोलत नाही । चालत नाही । ते निरंजन ॥२४॥ तेथे एक योगी । बैसला ध्यानस्थ विरागी । स्वस्थ चित्त अनुरागी । आत्मरुपी ॥२५॥ एक म्हणजे नव्हे दोन । हे श्रुती वचन प्रमाण । एकामाजी एक मिळवून । दोन दिसे ॥२६॥ मग का तया म्हणावे दोन । जे का सर्वत्र एकची पूर्ण । सर्वामाजी साधारण । अनन्य जे ॥२७॥ तयालागी कोण । म्हणेल साधारण । तरी ते असाधारण । साधारण असोनि ॥२८॥ काय असेल हा योगी जो का नव्हेची वियोगी । जीवपणा अुगी । सरला जेथ ॥२९॥ जीवपणाचा वियोग । तोची स्वरूपाचा योग । जीवपणाचा योग तरी काय ? ॥ ३० ॥ एक योग एक वियोग । एक असे योगा योग । आत्मयोग सुखभोग । त्या वियोगे दुखःची ॥ ३१ ॥ आत्मसुख तो देहदुःख । देहदुखः ते आत्म–

सुख । हे समीकरण चोख । वर्मांचे गा ।।३२।। चत्वार देहाचा निरास । तेथे खेचरी मुद्राप्रकाश । प्राणायाम सावकाश सहजेचि ।।३३।। आकाश मार्गी गमन करी । अुर्ध्वगामी लक्ष तरी । केंद्रित स्थिर बिंदुवरी । खेचरी ते ।।३४।। नासीकेचा प्राण । अनहत ध्वनी गर्जून । येतसे तो मार्ग कवण । तेथ लक्ष्य ।।३५।। जेथ चित्त जडता परम । सहज इंद्रिय मन संयम । सहज शांती अुपरम । अखंडीत ।। ३६ ।। प्रपंच वृत्तीचा रेचक । अहंब्रम्हवृत्ती पूरक । तेथ नैश्चल्य स्थीरता कुंभम । सुखासनी ।।३७।। आस नुरे ते आसन । आजस्त्र ब्रम्हा चे चिंतन । अकृत्रीम नसे आधीन । साधनांच्या ।।३८ ।। येथ वासना निमाली कल्पनाही ओसरली । वृत्ती स्थानापन्न झाली । पद्मासनी ।।३९।। जेथ होय शब्दाचा ग्रास । पहाता पहाणे होअुनि निरास । आत्मत्वेची आपणास । अवलोकी ।।४०।। पाहता पाहता लागली खेचरी । योगी झाला साक्षात्कारी । सेवुनि राहे निरं-



तरी । सत्राविसी ।।४१।। काही नाही परी चालीले । ते माया जाळ तेथ नातळे । चौदेहाचे सुटले । गुंताडेगा ।। ।।४२।। अुपाधोभूत जीवन । तेथ चित्ताचे केंद्रीकरण शुद्ध आकाशरूप जीवन । अुर्ध्वपंथी ।।४३।। तेथ देह भाव विलीन । मग काय करील मन । मनाचे सरले जीवन । तो ते तगे कै ।।४४।। निर्विषय जो आनंद । म्हणोनि तो ब्रम्हानंद । जेथे योगी सदा धुंद । नाद लुब्ध ।।४५।। कंठ आणिअुर । तेथ वाहे जीवनस्वर । ध्वनी तार मंद्र घोर । घोर नुरवी ।।४६।। येथ परतले मन । चाले अखंड चिंतन । आधारीचे जीवन । सह-स्त्रारी मिळाले ।।४७।। तेथ जीवन निवांत । सदा शांत शांत शांत । प्रगटला हृदयस्थ । परमात्मा ।।४८ ।। अनुहत ध्वनी । तेणेपरमपद निर्वाणी । राम कृष्ण नामी अुन्मनी । ज्ञानावस्था अखंड ।।४९।। शब्द झाला कुंठीत । वस्तु लाभली साक्षात । जया लक्षीता प्रचीत वेडावली ।।५०।। प्रगट ना गुप्त । जे का असेची

साक्षात । तेची योगीया होत । साक्षात्कारे ॥५१॥ दिनू तैसी रजनी । होता अवस्था ये क्षणी । ताटी चेतन्याची अुघडुनी । पावली तुर्या ॥५२॥ तुर्या ते ज्ञानावस्था । जेथ चैतन्याची आस्था । पावे अंखड स्वस्थता । मनोन्मन ॥५३॥ येथ अवस्थात्मक देह । देहावस्था नुरोनि विदेह । मनोन्मन समारोह । मुक्तरुप ॥५४॥ हेतु हा मावळला । शद्ब निःशद्ब जहाला । स्वरुपी तटस्थ राहीला । निजत्वेसी ॥५५॥ अनुकंपने अनुवृत्ती । अनूवृत्तीचे छंद होती । छंदे छंदे डोल होती । देहातीत वस्तूचे ॥५६॥ कलीमाजो स्वयंभ । श्रीपाद वल्लभ । जैसे का हे नभ । दिगंबर ॥५७॥ ज्ञानावस्था जीवनपरी । षडचक्राचे अुपरी । त्रिकुटा भीतरी । गोदागंगा ॥ ८॥ तया गोदेच्या तीरी । पंचमातृका पांचाळेश्वरी । स्नान करीती निरंतरी । संतसिद्ध ॥५९॥ सर्वा देती म्हणूनी दत्त । जे का आले सर्वस्व देत । म्हणोनी दत्तगुरु होत ।



जगग्दुरू ॥६०॥ ऐसे हे योगीराज । योगाग्रणी महाराज । होतो अंतरी विराज । ज्ञानेशांचे ॥६१॥ जेथ बाणली ज्ञानावस्था । तया ज्ञानिया होय देता । देता देता नसे घेता । घ्यावया ते नुरेची ॥६२॥ जेथ नासिली त्रिपुटी । प्राणायामाचे संपुटी । चित्ता चेतन्या पडे मिठी । नेत्रपुटी ॥६३॥ श्री ज्ञानेश्वरे दत्तस्तुती । केली ते त्यांची अनुभुती । जे का कळस नाथ पंथी । म्हणोनिया ॥६४॥ ठसावली चित्ती । बोळली ज्ञानाई कृपा मूर्ती । कैवल्य वैभवी लाधली संगती । समाधान दासरामी ॥६५॥

॥ श्री ज्ञानराजार्पणमस्तु ॥

गोकुळ अष्टमी

श्रावण वद्य ८ शके १८९३

**